पुढारी MY कोल्हापूर रविवार, ३० ऑगस्ट २०२६

# 'विवेकानंद'च्या एनसीसी छात्रांचा किल्ले मुडागड अभ्यास मोहिमेत सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी विभागातर्फे सह्याद्री प्रतिष्ठान आणि ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले मुडागड अभ्यास मोहीम उत्साहात पार पडली.

सह्याद्रीच्या पश्चिमेकडील घनदाट अरण्यातील मुडागड किल्ल्याची ऐतिहासिक व भौगोलिक माहिती इतिहास अभ्यासक मानसिंग चव्हाण यांनी दिली. काजिर्डा घाटाच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेल्या या वनदुर्गाचे महत्त्व, तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी हत्तींसाठी राखीव ठेवलेल्या 'शिवारण्य' जंगलाची माहिती देण्यात आली.

पडसाळी येथील दिलीप सावंत यांनी स्थानिक वाटाड्या म्हणून सहकार्य केले. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, एनसीसी विभागप्रमुख सीटीओ नम्रता नरेवाडीकर यांचे मार्गदर्शन लाभले. कर्नल विक्रम नलवडे यांचे प्रोत्साहन लाभले.

पुण्य नगरी | रविवार, ३० ऑगस्ट २०२६

# युवकांनी क्रीडा क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल करावे

## खा.महाडिक : 'विवेकानंद'मध्ये 'खेलो इंडिया संवाद'

कोल्हापूर : प्रतिनिधी

खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहण्याबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासही होतो. 'खेलो इंडिया'मुळे युवकांना विविध क्रीडा प्रकारांत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवण्याची संधी आहे. युवकांनी या संधीचा लाभ घेऊन क्रीडा क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन खासदार धनंजय महाडिक यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमध्ये 'खेलो इंडिया संवाद' आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशातील युवकांशी साधलेल्या ऑनलाईन संवादाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. आंतरराष्ट्रीय खो-खो खेळाडू वैष्णवी पवार आणि लॉन टेनिस खेळाडू ऐश्वर्या जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेत वीरधवल खाडे, राही सरनोबत आणि कृष्णराज महाडिक यांच्या कामगिरीचा उल्लेख केला.

सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील व समृद्धी चौगुले यांनी केले, तर डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

31.8.21